महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ १३ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११० ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्याहस्ते
# डोंबिवलीकर भजन भवनाचे लोकार्पण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** भजन हा महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीचा एक प्रमुख घटक असून डोंबिवली शहरालाही भजनाची परंपरा लाभली आहे. ही परंपरा जोपासणे हे कर्तव्य असल्याच्या कर्तव्यभावनेतून डोंबिवली पश्चिम येथील गणेश घाट येथे 'डोंबिवलीकर भजन भवन' उभारण्यात आले आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष, आमदार रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते या भवनाचे लोकार्पण करण्यात आले. आमदार विकास निधीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या डोंबिवलीकर भजन हितवर्धक सेवा संस्थेच्या या नवीन वास्तूचे आज लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी रविंद्र चव्हाण यांनी उपस्थित राहून डोंबिवलीकरांशी स्नेहसंवाद साधला. तसेच डोंबिवली पश्चिम येथील युवा गायक राजयोग धुरी यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी जेष्ठ नेते जगन्नाथ पाटील, लोकरे बुवा, शहाबाजकर बुवा, प्रमोद धुरी बुवा, मुणगेकर बुवा, चिले बुवा, भाई राणे बुवा, सतीश राणे बुवा यांच्यासह भाजपा माजी जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, भाजपा अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश महामंत्री शशिकांत कांबळे, माजी नगरसेवक राहुल दामले तसेच मोठ्या संख्येने डोंबिवलीकर उपस्थित होते.

## लक्षवेधी



## थाळी आणि गोळा फेक स्पर्धेत कमलताई किसन कथोरे महाविद्यालयाचे सुयश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दि. ११ ऑक्टोबर, २०२५ रोजी आत्मा मलिक स्कूल अघई तालुका- शहापूर जिल्हा- ठाणे येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय मैदानी (athletic) (१७ वर्ष खालील) क्रीडा स्पर्धेत सौ. कमलताई किसन कथोरे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय म्हसा चा विद्यार्थी कु. चैतन्य गवाळे यांनी गोळाफेक स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच थाळीफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळवून या खेळाडूची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या प्रसंगी जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रविंद्र घोडविंदे सर, संचालिका मा. सौ. स्मिता घोडविंदे मॅम, संचालक मा. श्री. प्रशांत घोडविंदे सर, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. योगेश माळी तसेच क्रीडा प्रशिक्षक प्रा. दिनेश शेळके यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक व अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## शहापूर तालुक्यातील बिबट्याचे स्थलांतर ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील ग्रामिण भागातील जंगलात किंवा मानव वस्तीत एरव्ही बिनधास्त पणे वावरणारे बिबटे सद्या स्थलांतरित झाल्याने अचानक दिसेनासे झाल्याचे दिसून येत आहेत. शहापूर तालुक्यातील डोळखांब, चोंढे, आजोबा देवस्थान, खराडे, साठगाव सारंगपुरी किंवा वाशाळा, तानसा, खर्डी, तानसा अभयारण्य, वाशाळा याठिकाणी मिळून जवळपास पंधरा ते सोळा बिबट्यांची वर्दळ असल्याची वनविभागाची अधिकृत माहिती होती. परंतु गेल्या दीड महिन्यापासून या बिबट्यांचा धुमाकुळ मंदावला असून हे बिबटे अचानक स्थलांतरीत झाल्याचे पाहायला मिळत आहे. पावसाळ्यापूर्वी परंपरागत मार्गाने शहापुरातील ग्रामिण भागात मोठ्याप्रमाणात बिबट्यांची संख्या वाढली होती. त्यामुळे वनविभागाची डोकेदुखी देखील वाढली होती. बऱ्याच ठिकाणी शेतकऱ्यांचे पाळीव श्वान, कोंबड्या, बकऱ्या तसेच गोठ्यातील जनावरे या बिबट्यांनी फस्त केली होती. काही ठिकाणी wनागरिकांवर देखील हल्ले झाले होते. परंतु हे नागरिक सुदैवाने बचावले. जंगल संरक्षणाचे दृष्टीने बिबट्याचे जंगलात वावरणे हिताचे असले तरी मानवावर हल्ले केल्यानंतर मानव संरक्षणाचे मोठे आवाहन वनविभागापुढे उभे राहाते. मात्र हा त्रास गेल्या दीड महिन्यापासून बंद झाल्यामुळे नागरिकांनी तसेच वनविभागाने सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

## आज भिवंडी तालुका पंचायत समिती आरक्षण सोडत

### जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (प्रतिनिधी) :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे पडघम वाजण्यास सुरवात झाली असून भाजप,शिवसेना, कॉँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना व राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षासह विविध पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी एकमेकांचे गाठीभेटी घेऊन युती आघाडी संदर्भात चर्चा सुरू केली आहे.तर दुसरीकडे राज्य निवडणूक आयोगाच्या सूचने नुसार भिवंडी तालुक्यातील २१ जिल्हा परिषद गट व ४२ पंचायत समिती गण यासाठीच्या प्रारूप मतदार याद्या ८ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आल्या असून राजकीय पक्ष व नागरिकांना त्या याद्या तहसीलदार कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार यांच्या दालनात पाहण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आल्याची आहेत अशी माहिती भिवंडी तहसीलदार अभिजित खोले यांनी दिली आहे. या मतदार याद्यांवर १४ ऑक्टोबर रोजी पर्यंत आक्षेप अथवा हरकती कार्यालयीन वेळेत घेता येणार आहे. संबंधितांनी त्या तहसीलदार कार्यालयात विहित वेळेत जमा कराव्यात असे तहसीलदार खोले यांनी स्पष्ट केले आहे. भिवंडी पंचायत समिती क्षेत्रातील ४२ गण असून त्यामध्ये अनुसूचित जाती,अनिश्चित जमाती,नागरिकांचा मागास प्रवर्ग व स्त्रियांसाठी राखीव जागांची सोडत आज सोमवार (१३) रोजी सकाळी ११ वाजता कामतघर येथील महापालिकेच्या वऱ्हाळ देवी मंगल भवन येथे होणार असून त्यासाठी नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन तहसीलदार अभिजित खोले यांनी केले आहे.

## भिवंडी महानगरपालिका प्रभाग रचनेस निवडणूक आयोगाकडून अंतिम मान्यता!

### कॉँग्रेस,भाजप कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

■ शरद भसाळे

**भिवंडी तालुक्यात पंचायत समिती व जिल्हा परिषद सार्वत्रिक निवडणूकीचे पडघम वाजू लागले असुन आरक्षण प्रक्रिया सुरू झाली असतानाच भिवंडी शहरात महानगरपालिकेच्या आगामी होणाऱ्या निवडणूकीसाठी 90 प्रभाग रचनेची अंतिम प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यामुळे शिवसेना, कॉँग्रेस, भाजप, समाजवादी, कोनार्क विकास आघाडी, राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षासह विविध राजकीय पक्षांच्या वतीने नगरसेवकानी मोर्चा बांधणी संदर्भात चर्चा सुरू केली आहे.**

महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग व शासनाच्या निर्देशानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीकरीता एकूण 23 प्रभागांचे प्रभाग रचने संदर्भात महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे लेखी पत्र अहवाल महापालिका प्रशासनाकडून पाठविण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन दि. 7 ऑक्टोंबर 2025 नुसार अंतिम मान्यता प्राप्त झालेली असल्याची माहिती महापालिका प्रशासना दिली आहे. महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग व शासनाच्या निर्देशानुसार भिवंडी निजामपूर शहर महानगर पालिकेच्या प्रारुप प्रभाग रचनेस दि. 01सप्टेंबर 2025 रोजी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांचेकडून मान्यता प्राप्त झाल्यानंतर दि. 03 सप्टेंबर 2025 रोजी सदरची प्रारुप प्रभाग रचना नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्याकरीता प्रसिद्ध करण्यांत आली होती. उक्त प्रारुप प्रभाग रचनेच्या अनुषंगाने नागरिकांकडून एकूण 84 प्राप्त हरकती व सूचनांवर प्राधिकृत अधिकारी मिरा-भाईंदर महानगरपालिकाआयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद शर्मा यांनी दि. 19 सप्टेंबर 2025 रोजी सुनावणी घेतली. सदर सुनावणीमध्ये प्राधिकृत अधिकारी यांनी उपस्थित सर्व हरकतदारांकडून हरकती व सूचना जाणून घेतल्या. त्यानंतर, त्यांच्या शिफारशींसह अंतिम प्रभाग रचनेचा प्रस्ताव ठाणे जिल्हाधिकारी व नगरविकास अतिरिक्त मुख्य सचिव नगरविकास विभाग यांचेमार्फत महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोग यांना मान्यतेकरीता सादर करण्यांत आला होता. सदर प्रभाग रचनेच्या अंतिम प्रस्तावास दि. 07 ऑक्टोंबर 2025 रोजी निवडणूक आयोग, यांनी अंतिम मान्यता दिलेली असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

## वनविभागाच्या जागेत बेकायदा चाळींचे बांधकाम जोरात

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नेवाळी :** डोंबिवली शहराचे फुफ्फुस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उंबार्लीत अतिक्रमणाला सुरुवात झाली आहे. बदलापूर वन विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या अंबरनाथ तालुक्यातील उंबार्लीत सर्रास अतिक्रमण करून चाळींचे नवनिर्माण हाती घेण्यात आले आहे. संबंधित विभागाचे या परिसरात दुर्लक्ष सुरु असल्याने वन विभागाच्या जागेत व्यावसायिक गाळे, जीन्स कारखान्यांच्या दूषित पाण्याचे तलाव आणि चाळींची काम वेगाने सुरु झाली आहेत. या दुर्लक्षामुळे भू माफियांची चांगलीच दिवाळी सुरू झाली आहे. त्यामुळे संबंधित विभागाचे अधिकारी उंबार्लीतील अतिक्रमणावर कारवाई केव्हा करणार असा प्रश्न उपस्थित झाला आहे. उंबार्ली गावात वन विभागाच्या जागेत हे अतिक्रमण वेगाने सुरू झाल्याचे दिसून येत आहे. डोंबिवली अंबरनाथ महामार्गाच्या कडेला असलेला या गावाच्या हद्दीत सर्रास चाळींची काम हाती घेण्यात आली आहेत. संबंधित विभागाच्या अधिकरात आणि सुरू असलेल्या अतिक्रमण धारकांवर कारवाईचा बडगा हाती घेतला जात नसल्याने वेगाने बांधकामे सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## उल्हासनगर शहरात नियमबाह्य फटाक्यांची विक्री ?

### अवैध साठाच्या शक्यतेने दुर्घटनेची भीती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**उल्हासनगर :** शहरातील फटाका विक्रेत्यांनी नियम पायदळी तुडवत केलेल्या अवैध फटाक्यांच्या मोठ्या साठ्यामुळे उल्हासनगरमध्ये स्फोट आणि मोठ्या दुर्घटनेची भीती निर्माण झाली आहे. मागील वर्षी मुरबाड रस्त्यावरील एका फटाक्याच्या गोदामात झालेल्या भयंकर स्फोटात उल्हासनगरातील व्यापारी मनीष नारंगचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या घटनेनंतरही शहरांतील फटाका विक्रेते आणि त्यांच्या गोदामांच्या सुरक्षा व्यवस्थेची स्थिती गांभीर्याने तपासली जात आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहेत.

रहिवासी भागांत स्फोटकांचा अवैध साठा केला आहे. विशेषतः बंदी घातलेले आणि नियमबाह्य फटाके विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तर विक्रीसाठी बंदी केलेले फटाके विक्री करू नयेत. तसेच महापालिकेने निश्चित केलेल्या ठिकाणीच परवानगी घेऊन फटाक्यांची विक्री करावी, अशी प्रतिक्रिया महापालिकेचे सहाय्यक आयुक्त अजय साबळे यांनी दिली.

उल्हासनगर शहरातील नेहरू चौक, उल्हासनगर-२ आणि इतर गर्दीच्या भागांतील गोदामांमध्ये नियमांचे पूर्ण उल्लंघन करून अवैध साठे ठेवले जात आहेत. याबाबत परिसरातील नागरिकांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रारी केल्या आहेत. जर या भागांमध्ये अचानक छापेमारी केली, तर अंदाजे १०० कोटी रुपयांच्या फटाक्यांचा साठा बाहेर येऊ शकतो, असे बोलले जात आहे.

## मनोज रानडे यांच्यावर ठाणे जिल्हा परिषदेच्या सीईओ पदाचा अतिरिक्त कार्यभार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**दि. १२ ऑक्टोबर -** जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे (भा.प्र.से) यांची बदली जिल्हाधिकारी, जळगाव या पदावर करण्यात आली असून, त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार जिल्हा परिषद पालघरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे (भा.प्र.से) यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. रोहन घुगे यांनी दि. ८ ऑक्टोबर, २०२५ रोजी मध्यान्होत्तर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे या पदावरून कार्यमुक्त होताना मनोज रानडे यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. मनोज रानडे यांनी दि. १० ऑक्टोबर, २०२५ रोजी दुपारनंतर जिल्हा परिषद ठाणे या पदाचा अतिरिक्त कार्यभार स्वीकारला आहे.

ठाणे जिल्हा परिषदेने रोहन घुगे यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या अनेक क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आता या वाटचालीला अधिक वेग देत नागरिकाभिमुख, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित प्रशासनाचा ध्यास कायम ठेवू, असे प्रतिपादन यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर व अतिरिक्त कार्यभार, जिल्हा परिषद ठाणे मनोज रानडे यांनी केले आहे.






## वाचक मनोगत

# नवीमुंबईच्या महापौर पदासाठी भाजप आक्रमक

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि वन मंत्री गणेश नाईक यांच्यातील राजकीय संघर्षाचा केंद्रबिंदू ठरलेल्या नवी मुंबईत भाजपचाच महापौर व्हायला हवा अशी ठाम भूमीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत घेण्यात आलेल्या बैठकीत उपस्थितांनी मांडल्याचे विश्वसनिय वृत्त आहे. महायुती करायची की नाही यासंबंधीचा निर्णय स्थानिक पातळीवर सर्वांनी एकत्र बसा आणि आम्हाला कळवा. त्यावर योग्य तोच निर्णय घेतला जाईल. मात्र नवी मुंबईसारख्या शहरात भाजपचा महापौर व्हायला हवा अशाचपद्धतीची आखणी करायला हवी, अशा सूचना मुख्यमंत्री आणि प्रदेशाध्यक्षांनी दिल्याने आगामी काळात शिंदे नाईक संघर्षाला आणखी धार येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

महापालिका निवडणुकांचा आढावा घेण्यासाठी दोन आठवड्यांपुर्वी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाशीतील फॉच्युन हॉटेलमध्ये पक्षातील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसोबत संवाद साधला होता. या बैठकीत त्यांनी नवी मुंबई महापालिकेवर भगवा फडकविण्याचे आनंद दिघे यांचे स्वप्न होते. दिघे साहेबांचे स्वप्न पुर्ण करण्याची वेळ आता आली आहे, असे सूचक वक्तव्य केले होते.' या निवडणुकीत युती होईल की नाही ते आम्ही ठरवू त्याचा विचार तुम्ही करु नका. तुम्ही आपआपल्या प्रभागांमध्ये काम करा. काहीही झाले तरी नवी मुंबईवर यंदा दिघे साहेबांच्या स्वप्नातला भगवा फडकावयाचा आहे' अशा शब्दात शिंदे यांनी भाजपचा बालेकिल्ला असलेल्या नवी मुंबईत आक्रमक भूमीका घेतल्याचे पहायला मिळाले.

एकनाथ शिंदे यांच्याकडे मुख्यमंत्री पद आल्यापासून त्यांनी नवी मुंबईवर पकड निर्माण करायला सुरुवात केली आहे. त्यामुळे भाजपचे स्थानिक नेते गणेश नाईक आणि त्यांच्यामधील संघर्ष वाढू लागला आहे. नाईक यांच्याकडे भाजपने यंदा वन मंत्री पद सोपविले. तेव्हापासून नाईक संधी मिळेल तेव्हा शिंदे यांना लक्ष्य करतात. भाजपच्या एका बैठकीत नाईक यांनी' ठाण्यात सत्ता मिळवायची असेल तर रावणाच्या अहंकाराचे दहन करायला हवे' असे वक्तव्य केले. त्यामुळे शिंदे आणि नाईकांदरम्यान कटुता आणखी वाढल्याचे चित्र आहे. नवी मुंबईत कोणत्याही परिस्थितीत नाईकांना धक्का द्यायचा अशीच शिंदे यांच्या पक्षाची रणनिती दिसते. त्यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना तसेच शरद पवार यांच्या पक्षातील माजी नगरसेवक, प्रभावी पदाधिकाऱ्यांना आपल्या पक्षात घेण्याची रणनिती शिंदे यांनी आखली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा हंगाम जवळ येऊ लागल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी वेगवेगळ्या भागातील पक्षाच्या स्थानिक नेत्यांशी चर्चा सुरु केली आहे. शनिवारी दिवसभर हे दोन नेते कोकण प्रातांतील पक्षाच्या स्थानिक पुढाऱ्यांशी संवाद करताना पहायला मिळाले. ठाणे, नवी मुंबई, मिरा-भाईदर, अंबरनाथ, बदलापूर, ठाणे ग्रामीण भागातील स्थानिक पुढाऱ्यांची, पदाधिकाऱ्यांची मते त्यांनी जाणून घेतली. यावेळी नवी मुंबईचाही विषय प्राधान्याने निघाला. नवी मुंबईत भाजपचा महापौर होईल अशीच परिस्थिती असल्याचे यावेळी स्थानिक नेत्यांनी उपस्थित नेत्यांना सांगितल्याचे समजते. त्यावर नवी मुंबईसारख्या शहरात भाजपचा महापौर व्हायला हवा. अशाच पद्धतीने आखणी करा, अशा सूचना या नेते आणि निवडक पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे सुत्रांनी सांगितले. युती संबंधी स्थानिक पातळीवर आधी चर्चा करा. कोणत्या जागा आपल्याला मिळायला हव्यात. मित्र पक्षाचे माजी नगरसेवक असलेल्या जागांवर सध्याची परिस्थिती काय, या सर्वाचा एकत्रित अभ्यास करुन आमच्यापुढे मांडा, अशा सूचनाही या मंडळींना देण्यात आल्या. यावेळी नवी मुंबईतील राजकीय स्थिती पक्षाला पोषक असून आपलाच महापौर होईल, असा दावा स्थानिक नेत्यांनी केल्याचे समजते.

# ऑनलाइन कामे कमी करण्यासाठी शिक्षण क्रांतीने प्रशासनाला दिले निवेदन

## विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर विपरीत परिणाम ■ ऑनलाइन कामे कमी करण्यासाठी शिक्षण क्रांतीचे प्रशासनाला निवेदन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** आजचा विद्यार्थी विकसित भारताचा भावी कर्तृत्ववान नागरिक होणार आहे. राज्यातील विविध विभागांतर्गत प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा चालवल्या जातात. यापैकी शासन अनुदानित, स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत चालवल्या जाणाऱ्या शाळांना ऑनलाइन माहिती भरावी लागते. दिवसेंदिवस ही माहिती भरण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे शाळेतील मुख्याध्यापकांसह सर्व कर्मचारी हैराण झाले आहे. त्याचा विपरीत परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्ययनावर होत आहे. ऑनलाइनच्या काही अंशी निरर्थक कामांमध्ये शिक्षक व्यस्त राहिल्यास ही पिढी शिक्षकाला देऊ शकते. पूर्वी शिक्षक शाळेत आज काय शिकवायचे याची पूर्वतयारी करून यायचा. सध्या हाच शिक्षक शाळेत गेल्यावर ऑनलाईनचे काय काम करावे लागेल ही धास्ती घेऊन शाळेत येत असतो. कामकाज ऑनलाईन करण्यासाठी डेटा भरणे हे जरी अत्यावश्यक असले तरी त्याला मर्यादाही असणे तेवढेच आवश्यक आहे. मर्यादेपलीकडे या कामाचा ताण वाढल्यामुळे शिक्षकांचे अध्यापनाच्या मूळ कामावरून लक्ष विचलित होत आहे. वेळीच यातगाद्याला आळा घालणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षण क्रांती संघटनेचे राज्याध्यक्ष सुधीर घागस यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शिक्षणमंत्री दादा भुसे, प्रधान सचिव रणजीतसिंग देओल यांच्याकडे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यावरील ऑनलाईन डेटा अपडेट करण्याचा ताण व भार कमी करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे. ऑनलाईन कामामध्ये यु-डायस प्लस, यु-डायस पोर्टल वर आधार वैधता, शाळा सोडून गेलेले व सतत गैरहजर असलेले विद्यार्थ्यांना ड्रॉप बॉक्समध्ये टाकून ड्रॉप बॉक्स क्लियर करणे, बाह्य शाळेतील मुले इम्पोर्ट करणे, उच्च माध्यमिक वर्गाचे सरल पोर्टलवर विद्यार्थ्यांची माहिती विषयनिहाय भरणे, निपून महाराष्ट्र अंतर्गत अप्रगत विद्यार्थ्यांचा शोध घेणे, squasf/FLN वर शाळेची पूर्ण माहिती भरणे, ईको क्लब वर माहिती भरणे, एसएचपीआर वर शाळा सुरक्षितता विषयी माहिती भरणे, एक पेड माँ के नाम, लोकेशन सह शाळा मॅपिंग, 100 कोटी वृक्ष लागवड, एनएमएमएस तसेच चार-पाच प्रकारच्या शिष्यवृत्ती, शैक्षणिक साहित्य प्राप्तीसाठी विद्यार्थ्यांनी पोर्टल भरणे, नॅशनल बिल्ड कॉन 2025 वर रजिस्ट्रेशन, नॅशनल क्रेडिट फ्रेमवर्क भरणे, आनंददायी शनिवार उपक्रम, ट्रेनिंग मॅनेजमेंट सिस्टीम, speak mkay उपक्रम, चर्चा प्रज्ञासावंतांशी उपक्रम, vocztinal अभ्यासक्रम, तमन्ना टेस्ट / सायकोमॅट्रिक टेस्ट, अटल टिंकरींग लॅब /आयसीटी लॅब / सायन्स मॅथ्स किट / रोबोटिक किट / जादूयी पिटारा, स्मार्ट क्लासरूम, प्रश्नपेढी, शालेय पोषण आहार, उल्हास ॲप, स्वच्छ विद्यालय, पालक सभा, विविध समित्यांचे गठन, दीक्षा ॲप, शासनाचे विधी योजना इत्यादी अनेक कामे शिक्षकांना आपले दैनंदिन कामकाज पूर्ण करावी लागतात.

व्हाट्सअप वर अचानक एखादा मेसेज किंवा लिंक येथे की ही माहिती तातडीने आजच्या आज किंवा उद्याच्या उद्या भरून पाठवावे अन्यथा कारवाई करण्यात येईल अशा धमकीसह सूचना येतात. शिक्षक मन लावून समर्पित भावनेने विद्यार्थ्यांना तन्मयतेने शिकत असताना अचानक शिकवणे सोडून वरीलपैकी एखादे ऑनलाईन काम करत बसावे लागते. त्यासाठी कधी जिल्हा परिषद, कधी पंचायत समिती, मनपा शिक्षण मंडळ, आयुक्त शिक्षण कार्यालय, कधी संचालक कार्यालय, कधी पोलीस स्टेशन अशा सर्वांच्या आदेशाचे तातडीने पालन करण्यात शिक्षकांचे अनेक दिवस वाया जातात. त्याचा फटका विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर होत आहे. यामुळे शिक्षकही सतत ताणतणावाखाली आहे. यामुळे अनेक शिक्षक मधुमेह, रक्तदाबाच्या दुर्धर आजारांनी ग्रासले आहेत. यासाठी निवडक तज्ञांची समिती स्थापन करून वर्षभरातून एकदाच ज्या वेळी प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली असते अशावेळी ही माहिती भरून वर्षभराच्या तणावातून शिक्षकांना मुक्त करावे या शिक्षकांच्या वेदना सुधीर घागस यांनी शासनापुढे मांडल्या आहेत.

# खारेपाट मातीचा इमान हरवला?

## ७८ वर्षांनंतर तरी पाणी मिळेल का? : सी.आर.म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण (प्रतिनिधी)** सन१९४७ मध्ये स्वातंत्र्याच्या पहाटेस जेव्हा भारत नव्या आशेने उभा राहिला तेंव्हा खारेपाट विभागानेही स्वप्न पहिली होती.पारतंत्रातील यातना संपुष्टात येतील आणि आपणास नवसंजीवनी मिळेल,कमीतकमी पाणी मिळेल, पाण्याचे दुर्भिक्ष संपेल,शेतीसाठी पाण्याची व्यवस्था होईल, शेती फुलून येईल, गावातच रोजगाराची संधी मिळेल आणि आम्ही अभिमानाने जगू,पण आत्ता ७८ वर्ष होऊनही परिस्थिती जैसे थे,त्यापेक्षा भयाण,पाणी,शेती विकास या तिन्ही आघाड्यांवर आमचा खारेपाट दुर्लक्षित राहिला आहे का मुद्दाम ठेवला आहे हा विचाराधीन मुद्दाआहे. असे मत पेण खारेपाट मधील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी व्यक्त केले.

शेतीसाठी पाणी नाही आकाशावर अवलंबून राहणाऱ्या शेतीची अवस्था काय होते,हे संपूर्ण महाराष्ट्र पाहत आहे,त्यात आमची अवस्था तीच. सिंचन प्रकल्प,धरणे,बोगदे, यांची नावे बदलली ,कोटीने निधी वाढवून सुद्धा प्रकल्पांची अवस्था सर्वांना माहिती आहेच,वर्तमान पत्राची पाने संपली,पण प्रकल्प,धरणे अपूर्णच.पाण्याचे राजकारण असेच भिजत ठेवलेले घोंगडे आहे,बळीराजाची जमीन पिका ऐवजी पाषाण बनत चालत आहे. याला जबाबदार कोण असा सवाल ही सी.आर.म्हात्रे यांनी केला.

जमिनीचा इमान हरवला आहे,कारण मानवाने निसर्गाशी केलेला करार मोडीत काढला आहे. आजपर्यंत मोजके लोकप्रतिनिधींनी सत्तेपेक्षा जनतेला महत्त्व दिले आहे,त्यांनी खुर्चीचे रक्षक बनणे टाळले आहे.आत्ता सर्वच ठिकाणी सत्ता,पैसा, राजकारण आणि जमेल तर थोडे समाजकारण.असे लोकप्रतिनिधींचे समीकरण बनत आहे.

स्वातंत्र्यानंतर बऱ्याच निवडणुका झाल्या, ग्रामपंचायती पासून लोकसभेपर्यंत प्रत्येक वेळी घोषणांचा पाऊस, पण सर्वांच्याच घोषणा हवेत विरल्या,इमान हरवला,इमान हरवला. आजमितीला जमीन सुपीक आहे, मात्र त्या भातशेती पर्यंत पाणी आणण्यासाठी खंबीर,निस्वार्थी नेतृत्वाची गरज आहे.जनतेचा सहभाग मिळेल पण त्या नेतृत्वाने विश्वास संपादन केला पाहिजे. आज जर लोक जागे झाले नाही तर खारेपाट मातीला दोष देणार नाही तर तो दोष देईल तो आपल्या मौनी स्वभावाला.मौन सोडा,बोला सडेतोड घाट माथ्यावर एक जरांगे सरकारला जमिनीवर आणतो त्यापेक्षा आपली ताकद आहे. लहरी पावसामुळे शेतीला सिंचनाच्या पाण्याशिवाय पर्याय नाही.

आपल्या नदी,नाले विहिरी ,मोठ्या केमिकल कंपनीमुळे दूषित झालेत त्यामुळे धरणाचे पाणी हाच दुबार पिकाला वरदान ठरेल.पूर्वीचे लोकप्रतिनिधी लोकांच्या सुख दुःखात दिसायचे, आताचे काही वगळता शिला न्यासावर नाव कोरण्यात धन्यता मानतात.अशी खंत ही व्यक्त केली.

खारेपाटाच्या आवाजात दिवसेंदिवस धार कमी होत आहे,आवाज कमी होत आहे. आवाज करणाऱ्यांनाच आवाज कोणीतरी दाबण्याचा प्रयत्न तर करत नाही ना असा विचार येतो. सेझ, MMRDA, नैना गेल,अलिबाग विरार कॉरिडॉर अनेकविध प्रोजेक्ट येऊ घातले आहेत.दडपशाही दिसत आहे. मोठा फौजफाटा ,कधी dron सर्व्हे, यातून तीन फुटापर्यंत मालकी हक्क,त्यानंतर सरकारची जमीन यामुळे भविष्यात काय दडले आहे हे समजून येत नाही. एक दुर्दैवी बाब म्हणजे जमीन आमची मात्र रोजगार परप्रांतियांना मिळतो,यावर नेते मंडळींची चुप्पी बरेच काय सांगून जाते. सधन असणारी शेती नापीक होत आहे,कधी समुद्राचे पाणी ,कधी केमिकल युक्त पाणी, शेतीला मारक ठरत आहे,पूर्वी शेवगा, वाल ,जांभळे विपुल असायची पण आत्ता दूषित हवेमुळे फळे,भाज्या दुर्मिळ होत आहेत. या विभागाचे ज्यांनी ज्यांनी नेतृत्व केले,त्यांनी त्यांच्या परीने प्रयत्न केले पण मूलभूत समस्या सुटलेल्या नाहीत मोठी धरणे पाणी इतरांची तहान भागवते,मात्र स्वकीय,स्थानिक पाण्यासाठी धडपडत.आहेत आंदोलने ,पायी मुंबई प्रवास बॅनर बाजी झाली मात्र धरण असून खारेपाट तहानलेले आहे.हा जीवन मरणाचा प्रश्न यावेळी तरी सुटणार आहे का नाही अशी आर्त हाकही सी.आर.म्हात्रे यांनी दिली.

पाणी नाही म्हणून गावातील तरुणाई शहराकडे गेली,सरकारी निधी येतो एकवर्षात दुरुस्तीला जातो असे कामाचे गळतीचे राजकारण. थोडक्यात खारे पाटाचे राजकारण पाण्यासाठी फिरत आहे. हाच प्रश्न पेटत राहिला तर जनता सोबत राहील .पाण्याचा प्रश्न मार्गी लागला तर जनता आपल्याकडे येणार नाही.एकंदरीत खारेपाट मातीचा इमान हरवला नक्कीच. असेही शेवटी सी.आर.म्हात्रेयांनी स्पष्ट केले.

# भिवंडी बस आगारातून नियमीत बस सेवा सुरु करण्याची मागणी !

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**झिडके-अंबाडी**

कोरोना कालावधीत पासून आजपर्यंत भिवंडी बस आगारातून ग्रामीण भागात खेड्यापाड्यात सर्वसामान्य प्रवाशांच्या सोयींसाठी सुरू केलेली नियमीत बससेवा पूर्णपणे सध्या बंद असल्यामुळेच प्रवाशांची अत्यंत गैरसोय होत आहे.ही गैरसोय दूर करण्यासाठी " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ भिवंडी ग्रामीण " यांच्याकडून लेखी पत्राद्वारे करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत गणेशपुरी, अंबाडी, खंबाळा, कुंदे, कांदळी, वापे, अघई, तानसा, करमाळा, आदि ग्रामीण भागातील बसेस भिवंडी आगारातून बंद असल्यामुळेच प्रवाशांना खाजगी गाड्यांतून प्रवास करणे भाग पडले आहे, त्यामुळेच नाहक आर्थिक भार सहन करावा लागत आहे, ही बाब " माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ" यांच्या निदर्शनास ग्रामीण भागातील प्रवाशाने आणून दिल्यानंतर महासंघाने याबाबत गांभीर्यपूर्वक दखल घेऊन वेळीच याबाबत कार्यवाही न केल्यास आंदोलन करण्याचे लेखी पत्राद्वारे कळविण्यात आले आहे. तसेच येत्या काही दिवसांत वर्षातून सर्वसामान्यांचा येणारा "दिवाळी सण" याकरिता खेड्यापाड्यातील प्रवाशी " भिवंडी सारख्या शहरात " विविध स्वरूपातील वस्तू खरेदीकरता मोठ्या प्रमाणात जात असतात परंतु भिवंडी आगारातून ग्रामीण भागात सुटणाऱ्या बसेस बंद असल्यामुळे येथील प्रवाशांची गैरसोय तर आहेच, त्याचबरोबर कुचंबणाही आहे.आणखीन महत्त्वाचे म्हणजे भिवंडी-वाडा या मार्गावर जवळपास 9 हायस्कूल व कॉलेजेस असल्यामुळे येथे शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचीही गैरसोय झाली आहे.तसेच विद्यार्थ्यांना दिले जाणारे "सावित्रीबाई फुले" प्रवाशी पासेस हेही भिवंडी आगारातून वेळेवर वितरीत केले जात नाहीत.

एकंदरीत भिवंडी बस आगाराच्या नाकर्तेपणामुळे "राज्य परिवहन महामंडळाचे" मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत आहे, हे नाकारण्यासारखे नाही. तरी भिवंडी आगार व्यवस्थापनाने ग्रामीण प्रवाशांच्या गैरसोयीचा विचार करून ग्रामीण भागातील नियमीत बससेवा रात्र पाळीच्याही त्वरित सुरू कराव्या की, जेणेकरून प्रवाशांना आंदोलनाचा पवित्रा घेणे भाग पाडू नये अशा स्वरूपाचे लेखी निवेदनही "माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाकडून करण्यात आले आहे."

# बिहार विधानसभा प्रचारासाठी धनराज गुट्टे यांची निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**



ठाणे : प्रतिनिधी राज्याच्या अहमदपूर तालुक्यातील येलदरवाडी गावचे सुपुत्र धनराज विक्रम गुट्टे यांची बिहार विधानसभा निवडणूक प्रचारासाठी निवड झाली आहे. दिल्ली येथील भाजपच्या केंद्रीय कार्यालयात शनिवारी दिनांक 11 ऑक्टोबर 2025 रोजी बिहार विधानसभा निवडणूक कार्य समितीची बैठक पार पडली. या बैठकीत बिहार विधानसभा निवडणूक प्रचारासाठी उत्कृष्ट संघटक व वक्ते धनराज गुट्टे यांची निवड झालेली आहे. त्यांच्याकडे एक विधानसभा मतदारसंघ असणार आहेत. सदरील बैठकीस भाजपचे राष्ट्रीय महासचिव सुनील बंसल, भाजप युवा मोर्चाचे राष्ट्रीय खासदार तेजस्वी सूर्या व सर्व राष्ट्रीय समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. धनराज गुट्टे हे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेपासून भाजपा सोबत जोडले गेलेले आहेत. यापूर्वी अनेक राज्यात त्यांनी विविध निवडणुकीत भाजपचा प्रचारक म्हणून जबाबदारी सांभाळली आहे. सध्या ते भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून वासिम, बुलढाणा जिल्ह्यातील प्रभारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहे. या निवडीबद्दल धनराज गुट्टे यांचे भाजपा पदाधिकाऱ्यांसह सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

# प्रथा - हॅंडलूम : साड्यांचा नवा अध्याय!

## पुण्यात लोकप्रियता मिळवल्यानंतर आता ठाण्यात भव्य शोरूम

पुण्यातील महिलांच्या मनावर अधिराज्य गाजवल्यानंतर, सुप्रसिद्ध ब्रायडल हेअर अँड मेकअप एक्स्पर्ट कविता कोपरकर यांचा 'प्रथा' हा लोकप्रिय हॅंडलूम साडी ब्रॅंड आता ठाण्यातील राम मारुती रोडवरील आपलं नवं आणि भव्य शोरूम घेऊन सज्ज झाला आहे. नुकतेच या भव्य शोरुमचे उदघाटन झाले. भारतीय हातमाग साड्यांच्या सौंदर्याला आधुनिकतेची झळाळी देणाऱ्या या ब्रॅंडच्या उद्घाटन सोहळ्याला मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक नामवंत कलाकार उपस्थित होते.

या विशेष कार्यक्रमाला श्रेया बुगडे, सोनाली कुलकर्णी, भार्गवी चिरमुले, चैत्राली गुप्ते, सावनी रविंद्र, राधा सागर, राधिका विद्यासागर, सुखदा खांडकेकर, मेघना एरंडे, शिवानी रांगोळे, गिरिजा ओक, क्षिती जोग, धनश्री काडगावकर, अमृता देशमुख, प्राजक्ता हनमघर, स्पृहा जोशी, तसेच लोकप्रिय अभिनेते शशांक केतकर, अभिजित खांडकेकर आणि मंजिरी ओक हे सेलिब्रिटी उपस्थित होते.

२०१६ साली केवळ ३२ सिल्क साड्यांपासून सुरू झालेली 'प्रथा'ची ही सफर आज हजारो साड्या विकणाऱ्या लोकप्रिय ब्रॅंडमध्ये रूपांतरित झाली आहे. ब्रायडल इंडस्ट्रीमध्ये ४५०० हून अधिक वधूंना सजवण्याचा अनुभव असलेल्या कविताने साडीप्रेम, रंगसंगतीची जाण आणि पारंपरिक कलाप्रेम यांचा संगम साधून 'प्रथा'ची स्थापना केली.

पुण्यातील भांडारकर रोडवरील २५०० चौ.फुटांचे आकर्षक स्टोअरनंतर आता 'प्रथा'चे आता ठाण्यात दोन मजली आणि सुमारे ३००० चौ.फुटांचे भव्य शोरूम आहे. या ठाणे स्टोअरमध्ये भारतातील ४० पेक्षा अधिक विविध वीण व पारंपरिक शैलीतील साड्या पाहायला मिळतील. प्रत्येक साडी स्वतः कविता कोपरकर वैयक्तिकरित्या देशभरातील वीणकरांकडून निवडतात. आजवर रेणुका शहाणे, मृणाल कुलकर्णी, अनुराधा पौडवाल, अमृता खानविलकर, सई ताम्हणकर, स्पृहा जोशी, पर्ण पेठे, शिवानी सोनार, शिवानी रांगोळे स्वानंदी टिकेकर यांच्यासह अनेक अभिनेत्रींनी या साड्या परिधान केल्या आहेत.

या प्रवासाबद्दल कविता कोपरकर म्हणतात, ' 'प्रथा' साडीच्या ब्रॅंडबरोबरच भारतीय परंपरेचं आणि स्त्रीच्या सौंदर्याचं प्रतीक आहे. ठाण्यातील या नव्या प्रवासातून आमचं उद्दिष्ट आणखी मोठं आहे. महाराष्ट्रातील पहिला असा साडी ब्रॅंड बनवण्याचं, जो देशभर आणि जगभर भारतीय हातमाग साड्यांचं वैभव पोहोचवेल."

या ब्रॅंडमध्ये ५० हून अधिक महिला कर्मचारीवर्ग कार्यरत आहे. प्रथाची दोन्ही स्टोअर्स शांत, आल्हाददायक आणि लक्झरियस इंटीरियरसाठी प्रसिद्ध आहेत. विशेष म्हणजे ठाण्यातील स्टोअरमध्ये एक वेगळा रिसेप्शन एरिया तयार करण्यात आला आहे, जो साडी स्टोअरसाठी अत्यंत अनोखा आणि आकर्षक आहे. प्रत्येक साडीप्रेमी स्त्रीला आपल्या बजेटनुसार परिपूर्ण साड्या इथे मिळणार आहेत.



# ॐ साई सेवा मंडळाच्या पालखीचे कल्याणच्या भोईवाड्यात आगमन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** सालाबाद प्रमाणे यंदाही ॐ साई सेवा मंडळ उरण करंजा येथील पालखीचे आज रविवारी कल्याणच्या भोईवाडा येथे स्व.नामदेव कुंभारे यांच्या निवासस्थानी पालखीचे आगमन झाले. त्यावेळी कल्याण भोईवाडा येथे ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश कुंभारे यांनी त्यांच्या दुपारच्या जेवणाची व्यवस्था प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही निष्ठेने पार पाडली. यावेळेस भोईवाड्यातील वार्ड क्रमांक ३५ चे शिवसेना युवासेना उपशहर प्रमुख मेघन सल्पी, भोई कोळी ज्ञाती समाजाचे माजी अध्यक्ष गणेश गुडदे, माजी नगरसेवक रमेश वाळंज, ज्येष्ठ समाजसेवक रामचंद्र बाबडे, युवा समाजसेवक रोहन गुडदे, धनंजय गुडदे, धीरज गुडदे, सनी कुंभारे, मनीष भोपी, स्वयंम कुंभारे, भोईवाडा महिला मंडळ अध्यक्ष सुवर्णा कुंभारे आणि सर्व भोईवाड्यातील ग्रामस्थ मंडळी उपस्थित राहून या पालखीची शोभा वाढवली. बाजारपेठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेंद्र सिंग गौड यांनी सपत्नीक पालखीचे दर्शन घेतले.

# भविष्यवेध



सोमवार
१३ ऑक्टोबर २०२५

**मेष**
धर्मात आस्था वाढेल. मार्ग प्रशस्त होईल. हुशारीने गुंतवलेले धन आपणास ध्येयाजवळ घेऊन जाईल. जोखिम असलेले कार्ये टाळा. जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये.

**वृषभ**
आरोग्य मध्यम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील. नाराजी दूर होईल.

**मिथुन**
नवे काम, विचार, योजना लांबणीवर ठेवा. आर्थिक विवादातून नुकसान संभव. आपल्या संपर्कात येणाऱ्या लोकांच्या वर्तनामुळे आपणास संताप येण्याची शक्यता आहे.

**कर्क**
योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल. काही नवीन संधी मिळतील. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल. आध्यात्मात मन रमेल. उत्पन्न वाढीबाबत योजना बनवू शकता.

**सिंह**
सामाजिक क्षेत्रात, ज्ञानवर्धक कामांमध्ये हजेरी द्यावी लागेल. नाते वाईकांशी भेट होईल. आपला दृढनिश्चय आणि आत्मविश्वास अधिक चांगल्या रीतीने कार्य करण्यास आपली मदत करेल.

**कन्या**
गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश आणि आनंद मिळेल. शांत राहाण्याचा प्रयत्न करा. पोरकटपणा करणे टाळा. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो. मतभेद दूर होतील.

**तुळ**
धार्मिक आयोजनात सहभागी व्हाल. भौतिक सुख प्राप्त होईल. विद्यार्थीच मन अभ्यासात रमेल. कौटुंबिक मतभेद दूर होतील.आपण जे करण्याची इच्छा ठेवता ते सुरुवातीपासून ठरवून घ्या.

**वृश्चिक**
योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल. काम व इच्छित योजनेला अमलात आणण्याचे प्रयत्न करा. घरातील वातावरण आनंददायी राहील. सामाजिक कामात सहयोग मिळेल.

**धनु**
विशेष महत्वाच्या आर्थिक कामात भाग्यवर्धक यश. वित्तीय कामांसाठी विशेष यात्रा. गूढ अनुसंधान संबंधी कार्ये होतील. आवडीच्या नातलगांना भेटा व स्वतःबद्दल त्यांची प्रतिक्रिया मिळवा.

**मकर**
आपण आपल्या घराच्या वाढीबाबत काही योजना बनवू शकता. ज्या व्यक्तीकडे फुकट घालवण्यासाठी वेळ आहे त्याचे ऐकण्याचा प्रयत्न करा आणि त्याला सल्ला द्या. यश प्राप्ति होईल.

**कुंभ**
सामाजिक क्षेत्रात लाभ प्राप्तिचा योग. गूढ कार्यात यश प्राप्ति .सामाजिक क्षेत्रात धार्मिक अनुसंधानाचा योग. व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. प्रेमीजनांसाठी दिवस आनंदाने परिपूर्ण.

**मिन**
व्यापार उत्तम चालेल. सामाजिक कामात सक्रिय सहयोग मिळेल. मुलांच्या तब्बेतीची काळजी दूर होईल. दिवस नवी सुरुवात करण्यास किंवा व्यक्तीमत्वाचे ध्येय ठरावण्यास साहाय्यक असू शकतो.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# बदलापूर - अक्कलकोट नव्या बस सेवेचा शुभारंभ



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**बदलापूर :** बदलापूर शहर तसेच परिसरातील नागरिक आणि स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तांसाठी एक अत्यंत आनंदाची बातमी आहे. दीर्घ काळापासून बदलापूर ते अक्कलकोट या बस सेवेची मागणी केली जात होती. ही मागणी अखेर मान्य झाली असून, नुकताच या नव्या बस सेवेचा शुभारंभ परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आशिष दामले यांच्या हस्ते झाला.

ही सेवा सुरू करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने सातत्याने पाठपुरावा केला होता. पक्षाच्या वतीने तसेच बदलापूरमधील नागरिकांच्या मागणीला प्रतिसाद देत महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने अखेर ही सेवा सुरू केली आहे. यामुळे बदलापूर परिसरातील नागरिकांना आणि स्वामी समर्थ महाराजांच्या भक्तांना आता थेट अक्कलकोटला सहजतेने जाता येणार आहे.

बदलापूर शहरातील बस स्थानक तुलनेने इतर शहरातील बस स्थानकांपेक्षा लहान आहे. मात्र गेल्या काही वर्षात या बस स्थानकाला व्यापक रूप प्राप्त होते आहे. गेल्या काही महिन्यात बदलापूर शहरातून राज्यातल्या विविध भागात थेट बस सुरू झाल्या आहेत. त्याचा फायदा दूरच्या प्रवाशांना होतो आहे. त्यासोबतच अनेक बस सेवा सुरू होण्याच्या मार्गावर आहेत. यातीलच एक मागणी नुकतीच पूर्ण झाली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अविनाश देशमुख यांच्यासह अनेकांनी बदलापूर ते अक्कलकोट बस सेवा सुरू करण्याची मागणी केली होती. नुकत्याच या बस सेवेचा शुभारंभ करण्यात आला. कार्यक्रमावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी या ऐतिहासिक उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले आणि नागरिकांचे तसेच पक्ष पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. "ही सेवा सुरू होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्यांचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे," असे मत या प्रसंगी अनेक मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.

# आम्हाला 'क्लस्टर' नको !

## कळव्यातील रहिवाशांचा एकत्रित पुनर्विकासाला विरोध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे : ठाणे महापालिका क्षेत्रातील झोपड्या, चाळी आणि बेकायदा धोकादायक इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्यासाठी समूह पुनर्विकास योजना (क्लस्टर) राबविण्यात येणार आहे. ठाण्यातील धोकादायक बेकायदा बांधकामांमध्ये जीव मुठीत धरून राहाणाऱ्या लाखो ठाणेकरांना हक्काचे घर मिळावे, यासाठी ही योजना राबविण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, या योजनेत सहभागी होण्यास अधिकृत इमारतीमधील रहिवाशांकडून विरोध होत असतानाच, आता ठाणे महापालिका निवडणुकीच्या तोंडावर कळव्यातील रहिवाशांनी क्लस्टर नको असे बॅनर इमारतीवर लावले आहेत.**

ठाणे शहरात मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारती पावसाळ्यात कोसळून जीवितहानी होते. अशा घटना टाळण्यासाठी अनधिकृत आणि अधिकृत इमारतींचा सुनियोजित तसेच संपूर्ण नागरी पायाभूत सुविधांसह पुनर्विकास करण्यासाठी क्लस्टर योजना राबविण्यात येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हा महत्वकांक्षी प्रकल्प आहे. या प्रकल्पासाठी ४५ नागरी पुनरुत्थान आराखडे ठाणे महापालिकेने तयार केले होते. त्याचे एकूण क्षेत्रफळ १५०० हेक्टर आहे. पहिल्या टप्प्यात किसननगर भागात सिडकोच्या माध्यमातून हा प्रकल्प राबविण्यात येत असून याठिकाणी प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून नागरिकांना हक्काची आणि मालकी घरे मिळणार आहे. क्लस्टर योजनेस मानपाडा भागातील झोपडपट्टी वासीयांनी यापूर्वी विरोध केला होता. घरावरील सर्व्हे क्रमांक पुसून टाकले होते. तसेच अधिकृत इमारतधारकांकडून योजनेस विरोध होत आहे.

म्हाडातील रहिवाशांनी प्रकल्पास विरोध केला होता. ठाणे शहरातील भीमनगर, पवारनगर आणि विवेकानंदनगर या परिसरात म्हाडाच्या मालकीची जमीन मोठ्या प्रमाणात आहे. या जमिनीवर 'म्हाडा'ने बैठ्या तसेच इमारतींच्या माध्यमातून वसाहती उभ्या केल्या आहेत. त्यात हजारो नागरिक वास्तव्य करीत आहेत. ठाणे महापालिकेने तयार केलेल्या ४९ नागरी पुनरुत्थान आराखड्यांमध्ये या भागांचाही समावेश आहे. परंतु येथील जागा 'म्हाडाह्च्या मालकीची असल्यामुळे पालिकेला या ठिकाणी क्लस्टर योजना राबविणे शक्य होणार नाही. त्यामुळे पालिकेने येथील १९.९७ हेक्टर (४९.३५ एकर) इतकी जागा भाडेतत्त्वावर देण्याकरिता 'म्हाडा'कडे ना हरकत पत्र मागितले. त्यास म्हाडा रहिवाशांनी आंदोलन करत विरोध केला होता.




# वसई विरार मनपाची निवडणूक लांबणीवर ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वसई :** वसई विरार महापालिकेची प्रभाग रचना अंतिम झाली असली तरी निवडणुकीवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या संपूर्ण प्रक्रियेविरोधात मुंबई उच्च न्यायालयात एकूण ४ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्यापैकी १ याचिका गावे वगळण्याच्या अध्यादेशावर, १ याचिका जिल्हा परिषद पालघर गट व पंचायत समिती वसई गण यामध्ये २९ गावे समाविष्ट न केल्याबाबत, १ याचिका पालिकेच्या प्रभाग रचनेविरोधात आणि एक याचिका 'पेसा' कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल आहे.

२००९ साली ४ नगरपरिषद आणि ग्रामपंचायतीचा समावेश करून वसई विरार महापालिकेची स्थापना झाली होती. त्यातील २९ गावांचा महापालिकेला विरोध होता. त्यामुळे २०११ साली राज्य शासनाने गावे वगळण्याचा अधिसूचना काढली होती. मात्र या निर्णयाला महापालिकेने न्यायालयात आव्हान दिले होते. तब्बल १४ वर्षांनंतर ऑगस्ट २०२५ मध्ये ही २९ गावे पुन्हा महापालिकेत घेण्याचा निर्णय राज्य शासनाने दिला आणि हा प्रश्न निकाली निघाला होता.

त्यामुळे निवडणूकीची प्रक्रिया सुरू झाली होती. परंतु आता राज्य निवडणूक आयोग, नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग, महापालिका आयुक्त, पालघर जिल्हाधिकारी आणि आयुक्त कोकण विभाग, यांनी केलेल्या प्रक्रियेविरोधात एकूण ४ याचिका दाखल करण्यात आल्याने निवडणूकीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

**सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी पर्यंत राज्यातील सर्व महापालिकांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. या संदर्भात ज्या काही याचिका दाखल असतील त्या ३० ऑक्टोबर पूर्वी निकाली काढण्या सांगण्यात आल्या आहेत. वसई विरार महापालिकेच्या निवडणूक प्रक्रियेविरोधात ४ याचिका आहेत. त्यात 'पेसा' कायद्याच्या उल्लंघनांच्या याचिकेमुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे वसई विरार महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवणणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

# अंबरनाथ : विविध उपक्रमांनी साजरा झाला जागतिक बेघर दिन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**बातमीदार**

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपरिषदेच्या वतीने जागतिक बेघर दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त नगरपरिषदेच्या बेघर निवारा केंद्रात अंबरनाथचे मुख्याधिकारी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दिवसभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. आरोग्य शिबिर, सुरेल भजन कार्यक्रम आणि भेटवस्तूंमुळे बेघरांचा दिवस लक्षणीय ठरला.

कार्यक्रमाची सुरुवात बेघर निवारा केंद्राला नवे नाव देऊन झाली. मुख्याधिकारी यांच्या सूचनेनुसार या केंद्राला आता "आसरा" असे नाव देण्यात आले असून, यामुळे या उपक्रमाला एक आत्मीय आणि ओळख निर्माण करणारा स्पर्श मिळाला आहे.

शहरातील नागरिकांपर्यंत बेघर निवारा केंद्राविषयी माहिती पोहोचावी याकरिता शहराच्या विविध भागांमध्ये 'आसरा बेघर निवारा केंद्र'चे फलक लावण्यात आले. याशिवाय शालेय विद्यार्थ्यांमध्ये बेघरांविषयी सामाजिक संवेदना निर्माण व्हावी या हेतूने निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून समाजातील बेघर नागरिकांविषयी जागरूकता आणि सहानुभूती व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान लाभार्थ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात उपस्थित लाभार्थ्यांची सामान्य वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्याचबरोबर महिला बचत गट व शालेय विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे लाभार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान केला.

दिवसभर चाललेल्या या उपक्रमांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचाही समावेश होता. भजनी मंडळाच्या माध्यमातून भजनाचा कार्यक्रम तसेच संध्याकाळी सुरेल गाण्यांचा कार्यक्रम घेण्यात आला, ज्यामुळे वातावरण आनंदमय झाले.

अंबरनाथ नगरपरिषदेच्या या उपक्रमामुळे सामाजिक जबाबदारीचे भान जपत समाजातील उपेक्षित घटकांबाबत संवेदनशीलतेचा संदेश देण्यात आला. 'आसरा' या नावाने बेघर निवाऱ्याला नवी ओळख मिळाली असून, हा उपक्रम शहरातील नागरिकांच्या मनात एक सकारात्मक छाप सोडणारा ठरला आहे.

# टिटवाळा - शहाड परिसरात फेरीवाल्यांवर पालिकेची कारवाई

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** दिवाळी सणाच्या काळात नागरिकांना चालण्यासाठी मोकळे पदपथ, रस्ते पाहिजेत. रेल्वे स्थानक परिसर फेरीवाला मुक्त पाहिजे म्हणून टिटवाळा अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी गेल्या दोन दिवसात टिटवाळा आणि शहाड रेल्वे स्थानक भागात सकाळ ते संध्याकाळपर्यंत कारवाई करून तीन टेम्पो सामान जप्त केले. अनेक फेरीवाल्यांच्या हातगाड्यांचा जेसीबीच्या साहाय्याने जागीच चुरा करण्यात आला. तर काही जप्त करून नेण्यात आल्या.

सणासुदीच्या काळात नागरिकांना चालण्यासाठी मोकळे रस्ते, पदपथ पाहिजेत म्हणून गेल्या दोन दिवसापूर्वी बेकायदा बांधकामांचे कर्दनकाळ म्हणून ओळखले जाणारे अ प्रभागाचे साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी फेरीवाला हटाव पथकाला कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक टिटवाळा पूर्व आणि पश्चिम रेल्वे स्थानक भागातील फेरीवाल्यांवर कारवाई सुरू केली. टिटवाळा पूर्व भाग हा सर्वाधिक वर्दळीचा आहे. यापूर्वी पाच ते सहा वेळा या भागातील दुकानदारांचे निवारे, हातगाड्या, टपऱ्या अ प्रभागाने जप्त, तोडून टाकल्या होत्या. तरीही आता पुन्हा फेरीवाल्यांनी या भागात पदपथ अडवून बस्तान बसविण्यास सुरूवात केली होती. टिटवाळा गणेश मंदिराकडे जाण्यासाठी हा एकमेव रस्ता आहे. तसेच, रेल्वे स्थानक भागात अरूंद रस्ता, त्यात फेरीवाले रस्त्याच्या दुतर्फा बसत असल्याने साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांनी पदपथ रस्ते अडवून बसणाऱ्या फेरीवाल्यांचे सामान जप्त करणे आणि हातगाड्या जागीच तोडून टाकण्याची कारवाई केली. अचानक कारवाई सुरू होताचा फेरीवाले सामान घेऊन पळू जाऊ लागले. पण त्या फेरीवाल्यांना जागीच पकडून त्यांच्या जवळील सर्व सामान जप्त करण्यात आले. पदपथावरील हातगाड्या, टपऱ्या जागीच तोडून टाकण्यात आल्या. या कारवाईच्यावेळी पोलीस बंदोबस्त होता. त्यामुळे धडक कारवाई सुरू असताना कोणीही फेरीवाला कारवाई पथकाला विरोध करण्यासाठी पुढे सरसावला नाही. या कारवाईमुळे टिटवाळा पूर्व, पश्चिम आता फेरीवाला मुक्त झाला आहे.

या कारवाईनंतर साहाय्यक आयुक्त पाटील यांनी शहाड पूर्व, पश्चिम रेल्वे स्थानक भाग आणि परिसरातील रस्ते, पदपथांवरील फेरीवाल्यांवर कारवाई केली. या कारवाईच्यावेळीही फेरीवाल्यांचे सामान, हातगाड्या जप्त करण्यात आल्या. रेल्वे स्थानकापासून दीडशे मीटरच्या आत एकाही फेरीवाल्याने बसू नये. पादचाऱ्यांचे रस्ते, पदपथ अडवून बसू नये अशा वारंवार सूचना देऊन फेरीवाले ऐकत नसल्याने अखेर साहाय्यक आयुक्त पाटील यांनी फेरीवाल्यांवर कठोर कारवाई केली. या कारवाईमुळे दिवाळीपूर्वी खरेदी केलेला माल पालिका पथकाने जप्त केल्याने फेरीवाल्यांची पंचाईत झाली.

गेल्या दहा महिन्याच्या कालावधीत अ प्रभाग हद्दीतील बेकायदा बांधकामे करणारे भूमाफिया, फेरीवाल्यांचा पूर्ण बंदोबस्त साहाय्यक आयुक्त पाटील यांनी केल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. अशाप्रकारची कारवाई यापूर्वी कधीही अ प्रभाग हद्दीत झाली नव्हती, असे नागरिक सांगतात. आयुक्त अभिनव गोयल यांनी साहाय्यक आयुक्त प्रमोद पाटील यांच्या या आक्रमक कारवाई बद्दल समाधान व्यक्त केले आहे. डोंबिवलीत अशाप्रकारची कारवाई फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर आणि ग प्रभागाचे साहा. आयुक्त भारत पवार यांच्याकडून सुरू आहे.

# बँकांमध्ये धनादेश रखडले ! - चेक वटत नसल्याने नागरिक, व्यापारी हतबल

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** दिवाळी तोंडावर आली आहे. जवाहिऱ्यांच्या दुकानात सोने-नाणे खरेदीसाठी नागरिकांची, व्यापारी, व्यावसायिकांची घाऊक व्यवहार पूर्ण करण्यासाठी बँकामध्ये पुरेशी रक्कम राखून ठेवण्याची तयारी सुरू आहे. यासाठी डोंबिवली, कल्याणमधील काही सहकारी, राष्ट्रीयकृत, कार्पोरेट बँकांमध्ये गेल्या सात ते आठ दिवसापूर्वी जमा केलेले धनादेश अद्याप वटण्याची प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने नागरिक, व्यापारी, व्यावसायिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

दिवाळी सणाच्या काळात नागरिकांकडून अधिक प्रमाणात सोने, नाणे, चांदी दागिने, या धातुच्या वस्तू खरेदी केल्या जातात. अलीकडे सराफांच्या दुकानात दोन लाखाच्या वरील खरेदी केल्यावर ती रक्कम आपल्या बँक खात्यामधून ग्राहकाला ऑनलाईन भरणा करावी लागते. त्याशिवाय व्यवहार पूर्ण होत नाही. त्यामुळे दिवाळी सणाच्या काळात, लक्ष्मी पूजनापूर्वी खरेदी करावे लागणारे ऑनलाईन माध्यमातून शेअर्स, सोने, नाणे, दागिने खरेदी करण्यापूर्वी बँकांमध्ये पुरेशा रकमेची गंगाजळी राखून ठेवावी म्हणून अनेक नागरिकांनी, शेअर्स व्यवसायातील व्यावसायिकांनी बँकांमध्ये गेल्या आठवड्यात विविध बँकांचे धनादेश वटविण्यासाठी जमा केले आहेत. काही व्यावसायिकांचे कोट्यवधीचे रूपयांचे दैनंदिन घाऊक व्यवहार असतात. त्यासाठी त्यांना ऑनलाईन व्यवहार करण्यासाठी बँकांमध्ये पुरेशी रोख गंगाजळी ठेवावी लागते. त्यामुळे अशा व्यावसायिकांनी बँकांमध्ये गेल्या आठवड्यात धनादेश जमा केले आहेत. आता सात दिवस उलटूनही हे धनादेश वटण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. याऊलट बँकांमधून बँकेच्या ऑनलाईन व्यवहारात काही तांत्रिक अडथळे आहेत. त्यामुळे ग्राहकांनी ऑनलाईन व्यवहार माध्यमातील युपीआय, आरटीजीएस, एनईएफटी, नेट बँकिग, मोबाईल बँकिंग आणि इतर माध्यमांचा वापर करण्याच्या सूचना दिवसांमधून सतत लघुसंदेशाच्या माध्यमातून ग्राहकांना पाठविण्यात येत आहेत. या सततच्या संदेशामुळे ग्राहक त्रस्त आहेत. चार ऑक्टोबरपासून बँकेत जमा केलेला धनादेश त्याच दिवशी काही तासात वटणार असल्याचे रिझर्व्ह बँकेने जाहीर केले होते. त्याच्या उलट परिस्थिती काही बँकांमध्ये दिसून येत आहे, अशा तक्रारी ग्राहकांकडून करण्यात येत आहे.

# ठाणे जिल्ह्यात वाहनांच्या संख्येत लक्षणीय वाढ

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**बातमीदार**

**ठाणे :** ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असताना वाहनांच्या संख्येतही लक्षणीय वाढ दिसत आहे. ठाणे जिल्ह्यात १ जानेवारी २०२३ ते ९ ऑक्टोबर २०२५ या तीन वर्षांहून कमी कालावधीत ६ लाख वाहनांची नोंदणी झाली आहे. यामध्ये सर्वाधिक वाहने दुचाकींसह, रिक्षा, मालवाहू वाहनेही आहेत. मध्यवर्गीय नागरिक ठाण्यात अधिक प्रमाणात वास्तव्यास असल्याने दुचाकींचे प्रमाण अधिक असल्याचे वाहतुक तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

ठाणे जिल्ह्यात नागरिकरण वाढले आहे. त्यामुळे वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण डोंबिवली भागात परिवहन सेवा पुरेशी नसल्याने बहुतांश नागरिक त्यांच्या खासगी वाहनाने किंवा रिक्षाने वाहतुक करतात. भिवंडी, नवी मुंबई, डोंबिवली आणि ठाणे शहरात गोदामे, कारखान्यांची संख्याही मोठी आहे. त्यामुळे येथील कारखान्यांतून माल वाहतुकही मोठ्या प्रमाणात होत असते. ठाणे जिल्ह्यात ठाणे, कल्याण आणि वाशी येथे प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यालये आहेत. ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाअंतर्गत ठाणे, भिवंडी येथील वाहनांची नोंद होते. कल्याण प्रादेशिक परिवहन कार्यालयात डोंबिवली, कल्याण, बदलापूर भागातील आणि वाशी प्रादेशिक परिवहन कार्यालयात नवी मुंबईतील वाहनांची नोंदणी होते. ठाणे जिल्ह्यात मागील तीन वर्षांहून कमी कालावधीत सहा लाख पाच हजार ३७७ वाहनांची नोंदणी झाली आहे. यापैकी बहुतांश वाहने ही दुचाकी, मोटार, प्रवासी रिक्षा, मालवाहतुक करणारी वाहने आणि कॅब या प्रकारातील आहेत.

**१ जानेवारी २०२३ ते ९ ऑक्टोबर २०२५ या तीन वर्षांहून कमी कालावधीत ६ लाख वाहनांची नोंदणी झाली आहे.**

पितृपक्षानंतर आणि दसऱ्याच्या कालावधीत वाहन खरेदीमध्ये मोठ्याप्रमाणात वाढ झाली. २२ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत ४ हजार २२६ वाहनांची नोंदणी झाली आहे. आता वस्तू आणि सेवा कर कमी झाल्याने वाहन खरेदी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नवी मुंबई महापालिकेच्या ऐरोली नाटयगृहाचं ६५ टक्के काम पूर्ण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई : नवी मुंबई महापालिकेचे वाशी येथे विष्णुदास भावे नाट्यगृह नागरिकांच्या व कलाकारांच्या पसंतीचे आहे. नव्या वर्षात नवी मुंबई महापालिकेचे आणखीन एक नाट्यगृह अस्तित्वात येणार असून ऐरोली येथील नव्या नाट्यगृहाचे काम ६५ टक्के पूर्ण झाल्याचा दावा नवी मुंबई महापालिकेने केला आहे. त्यामुळे आगामी वर्षात वाशी पाठोपाठ ऐरोलीत सुद्धा नाटक पाण्याची संधी उपलब्ध होणार आहे. ऐरोली येथील नव्या नाट्यगृहाच्या कामाची पालिका आयुक्त डॉक्टर कैलास शिंदे व अधिकाऱ्यांनी नक्कीच पाहणी केली. प्रत्यक्ष पाहणीअंती कामात गतीमानतेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निर्देश दिले आहेत**

नवी मुंबई महानगर पालिकेच्या वतीने ऐरोली से. ५ येथे भूखंड क्र.३७ वर बांधण्यात येत असलेल्या नुतन नाट्यगृहाच्या सुरु असलेल्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करीत नवीन वर्षाच्या प्रारंभी काम पूर्ण करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी प्रत्यक्ष पाहणीअंती दिले आहेत. या प्रसंगी आयुक्तांसमवेत शहर अभियंता शिरीष आरदवाड, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता संजय पाटील व संबंधित अधिकारी उपस्थित होते. ऐरोली येथील नाट्यगृह ८६० आसन क्षमतेचे नाट्यगृह ४ मजली आहे. पहिल्या व दुसऱ्या बेसमेंटमध्ये चार चाकी व दुचाकी वाहनतळाची व्यवस्था आहे. याठिकाणी तळ मजल्यावर काही भाग वाहनतळाचा असून मुख्य प्रवेशव्दारावर स्वागत कक्ष, बुकींग कार्यालय, फुड कोर्ट, प्रशासकीय दालन, भांडार गृह तसेच नाटय साहित्याची ने-आन करण्याकरीता स्वतंत्र प्रवेशव्दार आहे. पहिल्या मजल्यावर रंगमंच तसेच प्रेक्षागृहात ४७८ आसन व्यवस्था आणि ध्वनी नियंत्रण कक्ष व रंगीत तालीम कक्ष आहे. दुसऱ्या मजल्यावर बहुउद्देशीय सभागृह, ३८२ आसन व्यवस्था, भांडार कक्ष व महिला कलाकारांसाठी रंगभुषा कक्ष आहे. तिसऱ्या मजल्यावर पुरुष रंगभूषा कक्ष, ध्वनी, प्रकाश नियंत्रण कक्ष व्यवस्था आहे.

**ऐरोली येथील नाट्यगृह प्रकल्पाचे साधारणतः ६५टक्के काम पूर्ण झाले असून या कामाची गुणवत्ता राखत कामाला गती द्यावी व नवीन वर्षाच्या प्रारंभापर्यंत काम पूर्ण करण्याचे कालबध्द नियोजन करावे असे निर्देश दिले आहेत. - डॉ. कैलास शिंदे, आयुक्त नवी मुंबई महापालिका**



ठाणे ■ सोमवार
13 ऑक्टोबर 2025
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



# महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सुनील इंगळे सन्मानित

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुंबई येथील इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन च्या वतीने समाजातील निस्वार्थ सेवा करणाऱ्या समाजसेवकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.याच कार्यक्रमात कल्याण येथील बहिणाई ट्रस्टचे अध्यक्ष, समाजसेवक व ज्येष्ठ पत्रकार सुनील इंगळे यांना पत्रकारितेमधील उत्कृष्ट सेवेबद्दल त्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल व सामाजिक बांधिलकीतून स्वतः देहदान व नेत्रदान चा संकल्प करून पर्यावरण संदर्भात झाडे लावा पण ती जगवा यासाठी इतरांनाही त्याबाबत जागृत करण्याचे काम ते सतत करीत असतात. इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन अँटिपायरसी सेल मुंबईचे मुख्य तपासी अधिकारी माननीय रामजीत गुप्ता व सहकर्म फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. शितल पाटील यांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी ऑपरेशन कारगिल सर्जिकल स्ट्राइक वन इंडियन आर्मीचे महेंद्र गोविंद गवई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुनील इंगळे यांना प्राप्त झालेल्या पुरस्काराबाबत अभिनंदन व कौतुक केले जात आहे.



# डोंबिवली एमआयडीसीत घोरपडीचा वावर



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** डोंबिवली एमआयडीसी मध्ये फार पूर्वी अंदाजे 35 ते 40 वर्षांपूर्वी मोकळा परिसर असल्याने घोरपड, मुंगुस, साप असे विविध प्राणी दिसायचे परंतु हल्ली त्यातील घोरपडी या दिसेनाश्या झाल्या होत्या. मात्र शनिवारी सकाळी निवासी भागातील सर्व्हिस रस्त्यावर कडेला एका मोठ्या घोरपडीचे दर्शन झाल्याने पर्यावरण प्रेमीना सुखद आनंद मिळाला. साधारण दोन, अडीच फूट लांबीची ही घोरपड रस्त्याचा कडेला उभी असल्याचे पाहण्यास मिळाले. काही वेळातच ही घोरपड बाजूच्या झाडीत लुप्त झाली.

मानवी अतिक्रमणामुळे आणि काही लोक तिची शिकार करीत असल्याने घोरपडीचे अस्तित्व कमी झाले आहे. त्यामुळे तिचे दिसणे दुर्मिळ होत आहे. घोरपड ही शक्तिवान व ताकद असलेला सरपटणारा प्राणी असून घोरपड ही संरक्षित वर्गात असल्याने तिची शिकार करणे कायद्याने गुन्हा आहे. तसेच घोरपड ही बिनविषारी असून तिचा पासून माणसाला कुठलाही धोका नाही. ती आपल्या संरक्षणासाठी चावते किंवा तिची मजबूत, ताकदवान असलेली शेपटी मारते. तिचे उंदीर, साप, कीटक, मासे इत्यादी खाद्य आहे. पर्यावरणासाठी अशा प्राण्यांचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आणि गरजेचे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते राजू नलावडे यांनी सांगितले.

# प्रशासन अधिकारी भारत बोरनारे यांनी घेतला महात्मा गांधी शाळेचा आढावा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे यांनी रेल चाइल्ड संस्था संचलित महात्मा गांधी विद्यामंदिर प्राथमिक शाळा डोंबिवली पश्चिम या शाळेला सदिच्छा भेट दिली.शाळेचे मुख्याध्यापक अजय कुमार जोगी यांनी माननीय प्रशासनाधिकाऱ्यांचे यथोचित स्वागत करून शाळेविषयी माहिती दिली. प्रशासन अधिकाऱ्यांनी यावेळी थेट विद्यार्थ्यांशी हसत खेळत संवाद साधला. निपुण भारत अभियान अंतर्गत झालेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचा आढावा घेत विद्यार्थ्यांना प्रश्न विचारले गणितातील उदाहरणे सोडवण्यास दिली. त्यातून विद्यार्थ्यांच्या झालेल्या प्रगतीची दखल घेतली. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने उत्तरे देऊन सर्वांची मने जिंकली. त्यानंतर प्रशासनाधिकारी यांनी सर्व शिक्षकांशी संवाद साधत ते महात्मा गांधी शाळेचे माजी विद्यार्थी असल्याचे सांगितले व जुन्या आठवणींना उजाळा दिला.

याप्रसंगी रेल चाइल्ड संस्थेचे अध्यक्ष उल्हास झोपे, शाळा समिती सदस्य महाजन, नितीन मांडे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष विश्वास भोईर, सीआरसी प्रमुख गुप्ता, शाळेचे मुख्याध्यापक अजय कुमार जोगी आणि दोन्ही विभागाचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# घरेलू आणि नाका कामगारांना गृह उपयोगी संचाचे वितरण



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** रिपब्लिकन असंघटित कामगार संघटना आणि इमारत बांधकाम महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने कल्याण मधील मराठा समाज हॉल या ठिकाणी ३५० बिगारी मिस्त्री व संघटित कामगार यांना गृह उपयोगी संचाचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी तहसीलदार सचिन शेजाळ, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे राष्ट्रीय सचिव दयाल बहादुरे, अध्यक्ष जालिंदर बर्वे, उपाध्यक्ष बाळकृष्ण गायकवाड, अँड.संजय शंभरकर, अँड.धनंजय मोहोळ, अँड. पवार, सचिव रमेश बर्वे, पत्रकार राजू काऊतकर, इंद्रमणी उपाध्याय आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे आयोजन रिपब्लिकन संघटित कामगार संघटना महाराष्ट्र राज्य अध्यक्ष जालिंदर बर्वे, त्याच प्रमाणे राजू देशमुख, जालिंदर वाघमारे, सचिव बाळू उबाळे उपाध्यक्ष भास्कर काळे, खजिनदार मंगल धनगर, लैलावी, लक्ष्मी वाघमारे आदी कमिटी सदस्य उपस्थित होते.

नाक्यावर काम करणारा माणूस हा त्याच्या श्रमामधून मोठमोठ्या बिल्डिंग उभा करतो परंतु त्याला नीट राहण्यासाठी घरे देखील नसतात, तो भाड्याने राहत असतो. त्यामुळे त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी महाराष्ट्र शासनाने निधी दिला आहे त्याचा पुरेपूर वापर करून नाका कामगारांचा देखील मुलगा अथवा मुलगी यांना उच्चशिक्षित होण्यासाठी प्रयत्न करून त्यांना वकील डॉक्टर इंजिनियर कलेक्टर बनवणे हे माझं ध्येय आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे आयोजक जालिंदर बर्वे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील जगताप यांनी केले.

# भिवंडीतील आदर्श शिक्षकांचा खा.सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते सत्कार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**भिवंडी (प्रतिनिधी)**

विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी शासन कोट्यावधी रुपये खर्च करून नवीन शाळा इमारती बांधत आहे तर काही ठिकाणी दुरुस्तीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करत आहे.पण शाळेत शिकवायला पुरेसे शिक्षक नाहीत. असा सावळा गोंधळ सर्वत्र सुरू आहे त्यामुळे शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकवतात तारेवरची कसरत करावी लागते अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांचे नुकसान होते त्यामुळे या गंभीर प्रश्नाकडे राज्य शासनाचे शिक्षण विभाग व शालेय मंत्री यांनी लक्ष देणे आवश्यक आहे असे परखड मत भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांनी भिवंडीत झालेल्या कार्यक्रमात व्यक्त केले आहे.

भिवंडी पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने तालुका स्तरीय गुणवंत शिक्षक गुणगौरव समारंभाचे आयोजन नुकताच संपन्न झाला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे उपस्थिती होते.प्रसंगी पंचायत समिती माजी सभापती महादेव घरत ,विकास भोईर,गटविकास अधिकारी गोविंद खामकर,गटशिक्षणाधिकारी संजय अस्वले आदी मान्यवर व शिक्षण उपस्थित होते. यावेळी भिवंडी तालुक्यातील ९०० शिक्षकां पैकी १० शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने, मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा सन २०२३ - २४ अंतर्गत तीन शासकीय शाळा,खाजगी व्यवस्थापनाच्या तीन शाळा आणि आदर्श शाळा पुरस्काराने जिल्हा परिषद देवरुंग शाळेला गौरवण्यात आले.

यामध्ये संदीप लडकू मांजे, अर्चना दीपक डेगाणे, श्रद्धा शरद पाटील, पुष्पा परशुराम थोरात, छाया लक्ष्मण जाधव, जफर अहमद हुसेन मुजावर,शांताराम कुशा पवार,संदीप रामदास पाटील, विश्वास काथोड जाधव,मेघाली शशिकांत चौधरी, पुष्पावती तुकाराम भोईर, प्रिया प्रकाश पाटील, योगिता पुंडलिक चौधरी या शिक्षकांचा गुणगौरव सत्कार करण्यात आला.तर मुख्यमंत्री स्वच्छ सुंदर शाळा स्पर्धेत अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावलेल्या जिल्हा परिषद शाळा खंबाळे,जिल्हा परिषद शाळा सोनाळे, परिषद शाळा कुसापूर या शाळांचा तर खाजगी व्यवस्थापन शाळा गटात बि.बी. पाटील विद्यालय कुरुंद,कन्या विद्यालय वज्रेश्वरी,आश्रम शाळा शिरोळे या शाळांचा प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक आल्याने त्यांचा सुध्दा सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी जिल्हा परिषद शाळां मधील शिक्षकांच्या कमतरते बद्दल व शासनाच्या धोरणावर खासदार म्हात्रे यांनी नाराजी व्यक्त केली.भिवंडी तालुक्यात ३०८ जिल्हा परिषद शाळांमध्ये १९५ शिक्षक कमी आहेत.त्यामुळे लवकर रिक्त जागा भरणे आवश्यक असुन याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# भिवंडी तालुका कोतवाल संघटनेची नवी कार्यकारिणी जाहीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा दि. (प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील महसूल कार्यालयात महत्वाची भूमिका बजावणारे महसूल सेवक (कोतवाल) संघटनेची भिवंडी तालुका नवीन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर करण्यात आल्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



महसूल सेवक (कोतवाल )म्हणजे केवळ एक पद नव्हे तर तो गावाच्या शिस्तीचा, न्यायाचा आणि माणुसकीचा पहारेकरी.म्हणून ओळखला जातो. महसूल सेवक (कोतवाल )हा महसूल व्यवस्थेचा कणा आहे.तो असला की गावात कामकाजाला शिस्त, प्रशासनाला गती आणि जनतेला विश्वास मिळतो.अशा महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटने अंतर्गत भिवंडी तालुका महसूल सेवक (कोतवाल) संघटनेची नविन पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर झाली असून त्यात पुरुषोत्तम केणे अध्यक्ष, संतोष जाधव उपाध्यक्ष, चैतन्य पवार सचीव तर संघटक म्हणून रुपेश चिंतेवार, श्रीमती जागृती कातवारे, रघुनाथ गायकवाड व सल्लागार म्हणून नारायण मामा खजिनदार महेश थोरात यांची निवड करण्यात आली. यावेळी विजय गायकवाड, लक्ष्मण म्हात्रे, हनुमान भुरे, सारीका जाधव, रमेश गायकवाड, सुनिल पाटील, प्रशिता कांबळे, सुळे, प्रविण चव्हाण व इतर महसूल सेवक (कोतवाल) उपस्थित होते. तर यावेळी नवीन कार्यकारिणीच्या निवडीबद्दल भिवंडी तालुका तलाठी संघटनेच्या वतीने सर्वाचें अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# आदिवासी आरक्षणात घुसखोरीचा आरोप !

## पालघर जिल्हा आदिवासी कृती समितीच्या माध्यमातून मोर्चाचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पालघर (प्रतिनिधी)**

आदिवासींचे आरक्षण हे संविधानिक असून आदिवासी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण हे भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूचीनूसार देण्यात आले आहे. मात्र, एका आंदोलनानंतर बंजारा व धनगर समाजाचे लोक हे हैद्राबाद गॅजेटच्या आधारे अनुसूचित जमातीचे आरक्षण मिळवण्यासाठी घुसखोरी करण्याचा प्रयत्न होत आहे. हा प्रयत्न कदापि यशस्वी होणार नाही. आम्ही राजकीय पक्ष म्हणून नाही, तर समाज म्हणून एकत्र आलो आहोत, असे पालघर जिल्हा आदिवासी संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष आमदार विलास तरे यांनी सांगितले आहे. यावेळी आमदार तरे म्हणाले की, अनुसूचित जमातीची यादी बदलण्याचा अधिकार हा फक्त राष्ट्रपती व भारतीय संसदेस आहे. राज्य सरकारला गॅजेटचा संदर्भ घेऊन अनुसूचित जमातीत अन्य जातीची घुसखोरी करण्याचा अधिकार नाही. हैद्राबाद गॅझेट ला कोणतेही कायदेशीर किंवा संविधानिक बळ नाही.म्हणून हैद्राबाद गॅझेट च्या आधारे धनगर व बंजारा समाजाच्या लोकांना आदिवासींत आरक्षण देवू नयेत व इतर मागण्यांसाठी जिल्ह्यातील 41 संघटनासुद्धा एकत्र झाल्या आहेत. त्या समाज म्हणून सरकारला जाब विचारण्यासाठी आम्ही दि. 14 ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर उलगुलान जन आक्रोश मोर्चा काढणार, असा निर्धार पालघर जिल्ह्यातील चार आमदार, दोन माजी आमदार, खासदार व माजी खासदारांनी रविवारी मनोर येथे प्रमुख कार्यकर्त्यांच्या बैठकीदरम्यान केला. हा मोर्चा पालघर जिल्हा आदिवासी कृती समितीच्या माध्यमातून आयोजित करण्यात येणार आहे. सरकारला आदिवासींचे अस्तित्व दाखवण्याची वेळ आली आहे. पक्ष नाही समाज म्हणून आम्ही एकत्र आहोत. मोठ्या संख्येने एकत्र येऊन सरकारला आपले अस्तित्व दाखवून देऊ. 15 जातींना आदिवासी लाभ घ्यायचा असून, राज्यातील 25 विधानसभा मतदार संघातील राजकीय आरक्षणावर डोळा असल्याचे सांगत सामाजिक बांधिलकीतून एकत्र येण्याचे आवाहन डॉ. सवरा यांनी केले. आमचा आदिवासी समाज अजून भूमिहीन म्हणून जगतो. पेसा कायदा पूर्णपणे लागू होत नाही. आपण बिंदू नामावलीत आठ नंबरला आहोत. त्यामुळे आपल्या नोकऱ्यांची संख्यासुद्धा कमी झाली आहे. धनगर, बंजारा, कोळी, ठाकूर व इतर जाती सर्व एस. टी. मध्ये आरक्षण मागतात. एसीमध्ये का मागत नाही, असा सवालही आ. गावीत यांनी उपस्थित केला. निसर्गपूजक असलेल्या आदिवासींनी इतर धर्माची नक्कल करणे सोडले पाहिजे. जल, जमीन, जंगल सरकारकडून हिरावून घेतले जात आहे. बोगस आदिवासींना सरकारचे संरक्षण असल्याचा आरोप केला. आदिवासांचे अस्तित्व धोक्यात आल्याचे अँड. मीना काळूराम धोदडे यांनी सांगितले. जिल्ह्यातील पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींच्या ग्रामसभांचे ठराव घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी खा. डॉ. हेमंत सवरा, आ. राजेंद्र गावीत, माजी आ. श्रीनिवास वनगा, माजी सभापती संतोष बुकले, प्रतिभा गुरोडा, सुरेश रेंजड, सीमा धोदडे, सचिन शिंगडा, अँड. विराज गडग, आदिवासी बांधव उपस्थित होते.

# दिवाळीत आकाशकंदील उडविण्यावर बंदी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत आकाशकंदील (Flying Lantern) हवेत सोडणे, विक्री करणे आणि साठा ठेवणे यावर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आला आहे. हा आदेश दि. १७ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत प्रभावी राहणार आहे.

पोलीस उपआयुक्त (विशेष शाखा) रश्मी नांदेडकर यांनी जारी केलेल्या आदेशानुसार, दिवाळीच्या काळात नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर प्रज्वलित आकाशकंदील हवेत सोडले जातात. हे कंदील जमिनीवर येताना आग लागणे, मालमत्तेचे नुकसान किंवा इतर गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने ही बंदी आवश्यक असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशानुसार नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत प्रज्वलित आकाशकंदील उडविणे, विक्री करणे आणि साठा करणे पूर्णपणे प्रतिबंधित असेल.

या मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. नवी मुंबई पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, सण साजरा करताना सुरक्षिततेची काळजी घ्यावी आणि कायद्याचे पालन करून इतरांच्या जीवितास धोका निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.




# कोपर स्थानकात तरुणाची एक्सप्रेसखाली आत्महत्या

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** - मध्य रेल्वेच्या डोंबिवली रेल्वे स्थानका जवळील कोपर रेल्वे स्थानकात रविवारी दुपारी एका ३५ वर्षाच्या तरूणाने मुंबईकडे जाणाऱ्या भरधाव वेगातील एक्सप्रेसखाली झोकून आत्महत्या केली. या तरूणाचे नाव आणि त्यांची ओळख पटलेली नाही. हा तरूण कोपर रेल्वे स्थानकात पूर्व बाजुच्या दिशेने फलाटावरून उडी मारून रेल्वे मार्ग ओलांडून पूर्व भागातील बालाजी गार्डन संकुलाच्या दिशेने जाऊ लागला. तो पूर्व भागात जात असावा असे प्रवाशांना वाटले. पण तेवढ्यात मुंबईला जाणारी एक्सप्रेस आली. तरीही त्याने एक्सप्रेस जवळ येताच भरधाव वेगातील त्या एक्सप्रेसखाली स्वताहून झोकून उडी मारली. काही क्षणात तो - एक्सप्रेस इंजिनच्या धडकेत दूरवर फेकला गेला. हा प्रकार पाहताच कोपर रेल्वे स्थानकातील प्रवासी काही क्षण घाबरले. एक्सप्रेस निघून जाताच रेल्वे स्थानकातील कमांडोने ही माहिती तात्काळ डोंबिवली लोहमार्ग पोलिसांना दिली.

# शिवसेनेच्या माध्यमातून पेण येथे उद्यम सखी मेळाव्याचे उद्घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**
**पेण (प्रतिनिधी)**

शिवसेना महिला आघाडीच्या पुढाकाराने दिवाळी महोत्सवाच्या माध्यमातून मागील तीन वर्षापासून तालुक्यातील विविध महिला उद्योजकांना मोफत व्यासपीठ निर्माण करून दिल्याने तालुक्यात अनेक महिला उद्योजक निर्माण झाल्या आहेत असे गौरवोद्गार शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांनी उद्यम सखी मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी केले या मेळाव्याचे उद्घाटन आदिती दळवी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. ते पुढे म्हणाले की, उद्यम सखीच्या माध्यमातून उदयास आलेल्या अनेक महिला उद्योजीकांच्या व्यवसायाची प्रगती दिवसेंदिवस होत आहे. आज अनेक उद्योजक महिला आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊन स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत. त्यांच्या माध्यमातून इतरही अनेक महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे. हे यश शिवसेना महिला आघाडीच्या अंजली जोगळेकर यांच्या पुढाकाराने आयोजित उद्यम सखी या उपक्रमाचे आहे.

पेण तालुक्यात शिवसेना संघटनेचे सामाजिक कार्य



## दिवाळीनंतर रोहा व पेण मध्ये राजकीय फटाके फुटणार – आमदार महेंद्र दळवी

तळागाळापर्यंत पोहोचले असून सर्वसामान्यांमध्ये शिवसेनेची प्रतिमा दिवसेंदिवस उज्वल होत आहे. येथील पदाधिकाऱ्यांनी स्थानिक ग्रामस्थांचे विविध प्रश्न शासनाच्या माध्यमातून सोडविले आहेत, त्यामुळे शिवसेनेची ताकद पेण मतदार संघात वाढली आहे. दिवाळीनंतर आचारसंहिता लागु होऊन नगरपालिका निवडणूका होतील. दिवाळीनंतर रोहा व पेण मध्ये राजकीय फटाके फुटणार यात शंका नाही. पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्याही निवडणुका होऊ घातल्या आहेत. निवडणुकीसाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सज्ज व्हा, शेवटच्या घरापर्यंत, शेवटच्या मतदारापर्यंत पोहचा. आपली लढाई जिंकण्यासाठी आहे त्या दृष्टीने कामाला लागा. आगामी निवडणुकांमध्ये रायगडात भगवा फडकणारच अशी ग्वाही आमदार महेंद्र दळवी यांनी यावेळी दिली.

पेण येथील महात्मा गांधी मंदिर वाचनालयाच्या प्रांगणात ११ व १२ ऑक्टोबर या दोन दिवस या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. उद्योग सखीच्या या मेळाव्यात ५० महीलांनी सहभाग घेतला आहे. या कार्यक्रमाला उपजिल्हाप्रमुख उद्धव कुथे, तालुका प्रमुख तुषार मानकवले, प्रमोद मोरे , वैभव जोगळेकर, विधानसभा संघटक राहुल पाटील, लहू पाटील, यशवंत मोकल, नरेश शिंदे, नंदकुमार पाटील, शैलेश पाटील, विश्वनाथ शिंदे, चंद्रकांत पाटील, सुरेश कोळी,भारती सिंगासने अशोक वर्तक यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024